# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# शिवाजीनगर, पुणे – ४११ ००४

## ** प्रकटन **

**विषय** – सन २०१९-२० या वर्षाकरिता राज्यातील माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांसाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आयोजित करणेबाबत.

या प्रकटनाद्वारे राज्यातील सर्व मान्यताप्राप्त शाळांतील शिक्षकांना कळविण्यात येते की, सन २०१९-२० या वर्षाकरिता राज्यातील माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांसाठी मंडळाने राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आयोजित केली आहे. महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा असे मंडळातर्फे आवाहन करण्यात येत आहे. राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांनी मुख्याध्यापक/प्राचार्यामार्फत आपले निबंध मा.सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, बालचित्रवाणी शेजारी, शिवाजीनगर, पुणे-४११००४ **किंवा** विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण विभागीय मंडळ या पत्त्यावर **१५ डिसेंबर, २०१९** पूर्वी पोहोचतील, अशा रितीने समक्ष सादर करावेत किंवा पोस्टाने पाठवावेत. पाकिटावर '' **माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा सन २०१९-२०**''असा ठळक उल्लेख करावा.

मंडळाकडे निबंध सादर करण्याची अंतिम तारीख **१५ डिसेंबर, २०१९** अशी आहे. यानंतर प्राप्त झालेले निबंध विचारात घेतले जाणार नाहीत. राज्यस्तरीय निबंध स्पर्धेसंबंधीचे हे प्रकटन राज्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापकांनी सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणून द्यावे, तसेच त्यांना स्पर्धेत सहभागी होण्याकरिता प्रोत्साहित करावे, अशी विनंती आहे.

**निबंधाचे विषय**

१. माहिती तंत्रज्ञानाचा गुणवत्ता विकासासाठी उपयोग
२. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृतीची रुजवणूक
३. माझे नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम
४. जलव्यवस्थापन आणि जलसुरक्षेत शिक्षणाची भूमिका
५. ज्ञानरचनावादानुसार अध्ययन प्रक्रियेचे अपेक्षित स्वरुप

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, पुणे-०४

पुणे ४११००४
दिनांक : २३ ऑक्टोबर २०१९